# माझी चित्रकला : एक संवाद

## चन्द्रशेखर पुरन्दरे

भाषा आणि संवाद हे गेली कित्येक वर्षे मला पडलेले कोडे आहे. बोलणारा आणि ऐकणारा हे द्वैताचे शारीरिक रूप. बोलणारा एक असेल, अनेक असतील, ऐकणाराही एक असेल किंवा अनेक असतील आणि बोलणारा अगदी समोर असलाच पाहिजे असेही नाही. ज्ञानेश्वरी सांगणारे ज्ञानेश्वर आणि ती वाचणारा वाचक, यश जोहरचा सिनेमा आणि तो पाहणारे प्रेक्षक ही सगळीच द्वैतापासून सुरू होतात, द्वैतावर आधारित राहतात. मतैक्य होईलच असे नाही, पण काही वेळा एकमेकांना समजावून घेतात तो संवाद.

इथे एक गोष्ट स्पष्ट सांगायला हवी. 'संवाद' हा शब्द मी जरा खोल अर्थाने वापरत आहे. आपण दुकानात गेलो आणि एक किलो साखर मागवली, दुकानदाराने ती दिली आणि किती पैसे झाले ते सांगितले. आपण पैसे दिले आणि बाहेर पडलो - हा व्यवहार झाला. मी म्हणतो त्या अर्थाने हा संवाद नाही. नव्वद पंच्च्याण्णव टक्के भाषेचा वापर व्यवहारासाठी होतो. पण संकल्पनांची देवघेव, व्यवहाराच्या स्तरावरच्या वैचारिक, मानसिक स्तरावरची देवघेव याला मी संवाद म्हणत आहे.

संवादाचे दुसरे एक अंग आहे. आपल्या अस्तित्वाची ग्राह्यता स्थापित होण्यासाठी (Validation) बाह्य जगाची आवश्यकता असते. बाह्यजग म्हणजे 'मी' खेरीज असणारे जग. या जगाला 'माझी' जाणीव करून देण्यासाठी 'संवाद' असतो, तो नि:शब्दही असू शकतो. त्याच्या काही छटा माझ्या चित्रातून दाखवण्याचा मी प्रयत्न केला आहे.

कुजबूज (Gossip) - यात दोन मुली संवादाच्या आपल्या नेहमीच्या अर्थाने संवाद करत आहेत. (चित्र क्र.१)*

संभाषण (Conversation) - माणूस आणि कुत्रा संवाद करत आहेत. त्यांना भाषेची जरूरी नाही. (चित्र क्र. २)

एकमेकांशी संपर्क साधण्याची प्रक्रिया आणि एकमेकांना जाणून घेण्यापर्यंत पोहचण्याची प्रक्रिया या दोन्हीला आपण संवाद म्हणतो. ही जरा ढोबळ व्याख्या आहे, पण फार शब्दच्छल न करता तीच व्याख्या चालू ठेवू.

संवादात दोन घटक दिसतात. एक - वक्त्याची अभिव्यक्ती आणि दोन - श्रोत्याची त्यावरची प्रतिक्रिया. ही प्रतिक्रिया श्रोत्याचीही अभिव्यक्ती असते. ही साखळी चालूच राहते. संवादासाठी 'दुसरा' लागतोच. अगदी 'आपुलाचि संवाद आपुल्याशी' असेल किंवा 'एक झाड दोन पक्षी'सारखा 'स्व'गताचा प्रकार असेल, तरी सुद्धा.

माझ्यासाठी तरी चित्रकला हे अशा संवादाचे एक माध्यम आहे. माझ्या मते सौंदर्य हा कला प्रकल्पाचा फार किरकोळ भाग आहे. संवाद महत्त्वाचे. या लेखाचा विषय मी चित्रभाषेकडे का वळलो हा असल्याने त्यात 'मी' वारंवार येणे अपरिहार्य आहे. पण तो उल्लेख बराचसा निमित्तमात्र आहे. अहंभावी नाही. कारण एखादा निर्णय 'मी' घेतो तेव्हा त्यामागे भूतकाळ, स्थलकाल विशेष, राजकीय व सामाजिक संदर्भ असे अनेक पदर असतात. अगदी एखादा निर्णय 'आकस्मिक' वाटला, 'मी असे करेन असे कधीही त्याआधी वाटले नव्हते' अशा स्वरूपाचा वाटला, तरी दीर्घ कालावधीपासून चालत आलेल्या आणि गुंतागुंतीच्या प्रक्रिया त्यामागे असतात. त्या सगळ्याची सुसंगत, तर्कनिष्ठ उकल करणे शक्य आहे, पण त्याची जरूरी नाही. किंबहुना, सिंहावलोकन हा स्वत:ला फसवण्याचाच प्रकार असतो. १९८५ साली आपण एखादा निर्णय का घेतला, याची मीमांसा करणे २००० साली सोपेही असते आणि ती मीमांसा तर्कशुद्धतेने करताही येते. पण १९८५ साली तो निर्णय घेताना अनेक पदर त्यामागे असतात. त्यात अंतर्विरोधही असतो. या अंतर्विरोधांमुळे तर तो विशिष्ट निर्णय घेणे त्यावेळी कठीण झालेले असते. सिंहावलोकनात कोडी 'कोडी' राहत नाहीत. ती सुलभतेने सुटलेली आणि तर्कसंगत दिसतात. एका चित्राद्वारे हे विचार प्रकट करण्याचा मी प्रयत्न केला आहे. चित्राचे नाव (Things fit in retrospect) 'सिंहावलोकनात सगळी कोडी सुटलेली दिसतात.' (चित्र क्र. ३) चित्रात उजवीकडे काही घन आकार पाण्यात तरंगताना दिसतात. डावीकडे ते एकत्र येऊन त्यांचा एक सलग ठोकळा झालेला दिसतो.

संवादाची सवय, गरज व प्रसंगी व्यसन हे चित्रकलेकडे वळण्याचे माझे कारण. प्राथमिक शाळेपासून म्हणजे वयाच्या सातव्या-आठव्या वर्षापासून मी शालेय वक्तृत्व/वादविवाद स्पर्धांत भाग घेत असे. लोकांशी संवादाची सुरूवात तेव्हापासून झाली. मी इंजिनिअर होईपर्यंत हा सहभाग चालू राहिला. इंजिनिअरिंगला असताना मी राजकीय व सामाजिक विषयांवर लिहायलाही सुरूवात केली. 'माणूस' साप्ताहिकात मी एक नियमित सदर लिहित असे. १९७७ साली आणीबाणी उठल्यावर 'माणूस'साठी मी आणि एक सहकारी यांनी प्रत्यक्ष अभ्यासानंतर आंध्र प्रदेशातील नक्षलवादी चळवळीवर एक लेखमालाही लिहिली होती. नक्षलवादी, तेव्हाचे आंध्रचे पोलीस कमिशनर विजय रामा राव (ते नंतर सी.बी.आय.चे प्रमुख झाले), मुख्यमंत्री

* या लेखात उल्लेखिलेल्या चित्रांना क्रमांक दिले असून त्या चित्रांच्या छोट्या प्रतिमा क्रमवार लेखातील पान १६०-१६१ वर छापलेल्या आहेत.

वेंगल राव यांना आम्ही भेटलो होतो. आणीबाणीतील पोलिसी अत्याचाराचे नक्षलवादी बळी हा या लेखमालेचा रोख होता.

१९७९ ला मी इंजिनिअर झालो आणि लगेचच पुण्याच्या टेल्कोमध्ये नोकरीला लागलो. नंतर मुंबईतही इंजिनिअर म्हणून नोकऱ्या केल्या. या चार-पाच वर्षांत लिखाण, बाहेरील समाज यांचा माझा संबंध पूर्णपणे तुटला. नाही म्हणायला एखाद्या पुस्तकाचे परीक्षण, एक भाषांतर करण्याचा प्रयत्न वगैरे किरकोळ काडीचे आधार शोधण्याची धडपड मी केली. या काळात एकूण उद्योगव्यवस्था-उत्पादन-विक्री-व्यवस्थापन, त्याचे अर्थशास्त्र वगैरेचा मला पुरेसा अंदाज आला. ते विश्व किती मर्यादित आहे आणि त्याचे तर्कशास्त्र सुसंगत असले तरी बृहत् समाजाच्या संदर्भात किती तोकडे आहे याचेही दर्शन झाले. १९८५-८६ ला मी परत पुण्यात आलो. उपजीविकेसाठी उद्योगधंद्यांची इंजिनिअरिंग संबंधित कंत्राटे घ्यायची आणि समाजसंशोधनाला काही वेळ द्यायचा ही कसरत पुढची पाच-सात वर्षे केली. पुण्यातील दोन-तीन संशोधन संस्थांशी माझा संबंध आला. एखाद्या अभ्यासप्रकल्पाच्या अभ्यास गटाचा सभासद म्हणून मी काम करत असे. मोबदला हा त्यात गौण होता. अशा दोन-तीन प्रकल्पांची माहिती देतो, कारण त्यांनी पुढे माझ्या चित्र-युगावर बराच प्रभाव टाकला.

१९८५ साली महाराष्ट्र सरकारला विशेषत: महाराष्ट्र उद्योग विकास महामंडळाला (एम.आय.डी.सी.) मुंबईच्या उत्तरेला विरार येथे एक मोठी औद्योगिक वसाहत काढायची होती. सध्या जसे 'विशेष आर्थिक क्षेत्रा'चे राजकारण आणि समाजकारण गाजते आहे, तसाच पण अगदी लहान प्रमाणात बीजरूपाने हा प्रश्न तेव्हाही निर्माण झाला होता. तिथले स्थानिक रहिवासी, संभाव्य विस्थापित, समुद्रात मासेमारी करणारे कोळी, मिठागारात काम करणारे वगैरेंचा विरोध होण्याची शक्यता होती. या संभाव्य विरोधाला उत्तर म्हणून एम.आय.डी.सी.ला एक अभ्यास करून हवा होता. येथे कोणत्या प्रकारचे व्यवसाय येऊ शकतील, उपनगरी लोकल वाहतुकीवरील ताण कमी होईल की जास्त, पर्यावरणावरील परिणाम, पाणी-वीज यांची गरज, कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या स्थानिक लोकांना मिळू शकतील इत्यादी अनेक गोष्टींचा विचार या अभ्यासात आमच्या अभ्यासगटाने केला. ही वसाहत येणार का नाही हे शेवटी त्यावेळची बॉम्बे मेट्रोपोलिटन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी ठरवणार होती. त्यामुळे या अभ्यासाचे निष्कर्ष या ऑथॉरिटीला पटवून देणे हा याचा उद्देश होता. रस्ते-पाणी या सुविधा विकून एम.आय.डी.सी.ला पैसे मिळवायचे होते. मुळात ही रिअल इस्टेट कोण बळकावतो यावर निरनिराळ्या शासकीय खात्यांमध्ये चुरस होती. ग्रामीण महाराष्ट्रातल्या छोट्या इंडस्ट्रिअल इस्टेटस् तोट्यात जातात. हा तोटा भरून काढायचा तर महानगराजवळ नवी इस्टेट निर्माण करणे आणि त्या जमिनी चढ्या किमतीला देणे भाग आहे हे एम.आय.डी.सी.चे यामागचे समर्थन होते.

अहवाल सादर केला, चर्चाही झाल्या. मग यथावकाश मोठे बिल्डर्स, राजकारणी, स्थानिक रहिवाशांच्या संघटना सगळेजण पुढे सरसावले. नंतर या योजनेचे काय झाले ते माहीत नाही. पण 'विकासा'चा राजकीय अर्थ काय याची झलक यात पहायला मिळाली. शासनसंस्थेवर मी पुढे एक चित्र काढले. त्यात अमेरिकाही होती, पण कोणतीही शासकीय व्यवस्था कशा प्रकारे चालते याचे थोडेफार चित्रणही होते. या चित्राचे नाव 'The lethal ones - bureaucracy and America' (दोन निर्घृण संस्था : शासन आणि अमेरिका).

दुसरा एक अभ्यास नाबार्ड या शेती क्षेत्रातील मध्यवर्ती बँकेसाठी केला. पुण्याजवळच्या अहमदनगर जिल्ह्यातल्या पारनेर आणि श्रीरामपूर या दोन तालुक्यांतील गरीब कुटुंबांना काही घरगुती उद्योग चालू करून देता येतील का हे पाहण्यासाठी हा अभ्यास होता. पारनेर हा कायमचा दुष्काळी तालुका. श्रीरामपूर पाण्याने समृद्ध आणि उसाखालचा तालुका. पारनेर तालुक्यातील एका वस्तीतील आधीच्या अस्पृश्य व अलीकडच्या दोन पिढ्यांत धर्मांतर करून ख्रिश्चन झालेल्या तीस-एक कुटुंबातील स्त्रियांना रोजगार उपलब्ध करून देण्याची शक्यता पाहणे हा आमच्या अभ्यासाचा भाग होता. ही सगळी कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली होती. ख्रिश्चन झाली तरी अस्पृश्यतेचा शिक्का न गेल्याने ही सगळी वस्ती त्या लहानशा खेड्याच्या बाहेरच होती. खेड्याच्या राजकीय भूगोलाच्या दृष्टीने हे विशेष महत्त्वाचे उदाहरण होते. नगर जिल्ह्यांत पाणलोट विकास क्षेत्रात बरीच वर्षे काम करत असणाऱ्या एका ख्रिश्चन धर्मादायी संस्थेने आम्हाला या स्त्रियांपर्यंत नेले. वस्तीवर आम्ही कधीही गेलो तरी पुरुषमंडळी कधीच दिसली नाहीत. अर्थार्जन स्त्रियाच करत व कुटुंब चालवत. अर्थार्जन सुद्धा काय, तर ऊसकापणीच्या वेळी गुरांसारखे त्यांना ट्रकमध्ये भरण्यात येईल आणि शेतावर नेण्यात येई. रात्री परत आणून सोडण्यात येई. हे काम वर्षातून तीन-चार महिने. रोजचा दिवस दहा-बारा तासांचा आणि कमालीच्या शारीरिक कष्टाचा. या स्त्रियांची भौगोलिक जाणीव अगदी मर्यादित होती. बाहेरच्या जगाची आर्थिक जाणीवही नव्हती. त्यामानाने श्रीरामपूरच्या लोकांची परिस्थिती बरी होती. निदान राहण्या-खाण्याची तरी इतकी भयानक परिस्थिती नव्हती. शिवणकाम, बारीकसारीक वस्तू बनवणे, कागदाची पाकिटे करणे अशा कमीत कमी तंत्रज्ञानावर आधारित गोष्टी त्यांना निदान समजू शकत होत्या. पुढाकार घेऊन ती मंडळी पुण्याच्या बाजारपेठेत येऊनही गेली. पारनेरच्या अतिदरिद्री स्त्रियांसाठी मात्र आम्ही काही करू

शकलो नाही याची रूखरूख मला कायम वाटते. त्याचे प्रतिबिंब दारिद्र्य विषयावरच्या अनेक चित्रांत पुढे पडले. युरोपमध्ये फिरल्यावर आणि ब्रिटनमध्ये राहिल्यावर तर तिथली 'गरीबी' पाहून खरी, हाडांपर्यंत जाणारी गरीबी म्हणजे काय ते त्या लोकांना ओरडून सांगावे असे वाटले. दारिद्र्यावरची काही चित्रे अशी :

गरजा चैन नव्हे (needs, not wants) (चित्र क्र. ४) - हे चित्र Art People Routine Explicit मध्ये आहे. यावरील एका अमेरिकन/कॅनेडियन प्रेक्षकाची प्रतिक्रिया खालीलप्रमाणे - 'तुम्ही स्वत: गरीबीचा अनुभव घेतला नसतानाही, इतक्या निष्ठुर प्रामाणिकपणे गरीबी चित्रित केली आहे हे विस्मयकारक आहे. विझलेल्या आशेचा अंधार तिच्या चेहऱ्यावर दिसतो.'

गरीबीवरचे माझे दुसरे एक चित्र म्हणजे 'दारिद्र्य, हे आणि ते' - (Poverty - formal and substantive) (चित्र क्र. ५)

तिसरा अभ्यास आय.डी.बी.आय. या औद्योगिक क्षेत्रातील मध्यवर्ती बँकेसाठी होता. पुण्यातल्या कसबा पेठेत पवळे चौकात तांबा-पितळ या धातूंच्या पत्र्यापासून भांडी बनवणाऱ्यांची मोठी वस्ती आहे. हा या लोकांचा पारंपारिक व्यवसाय. मागे राहते घर आणि पुढच्या ओसरीत वर्कशॉप हे या परिसराचे स्वरूप. दिवसभर ठाकठोकीचा आवाज. स्टेनलेस स्टील आणि ॲल्युमिनिअमचा वापर घरगुती भांड्यांसाठी सुरू झाल्यापासून तांबा-पितळीच्या भांड्यांचा बाजार संपुष्टात आला आणि या जवळजवळ ८० कुटुंबांची परिस्थिती हलाखीची झाली. दोन पिढ्यांपूर्वी जे छोटे उद्योजक होते ते आता रोजंदारीवर काम करणारे मजूर झाले. लागणारा कच्चा माल म्हणजे पत्रा दलालाकडून आणायचा, भांडी तयार करायची आणि ती भांडी दलालाला परत सुपूर्द करून प्रत्येक भांड्यामागे काही मजुरी मिळवायची ही यांची उपजीविका. म्हणजे व्यापाराच्या कोणत्याच टोकाशी त्यांचा बाजाराशी संबंध नव्हता. ना कच्चा माल खरेदी करण्याच्या टोकाशी ना विकाऊ माल विकण्याच्या टोकाशी.

आमच्या अभ्यासाने यातले पाच उमेदवार निवडून त्यांना शोभेच्या वस्तू याच पत्र्यांपासून बनवण्याचे प्रशिक्षण दिले. प्रकल्पाच्या शेवटी त्यांचे एक प्रदर्शन भरवले. या वस्तूंच्या किंमती या लोकांनीच ठरवल्या आणि प्रत्यक्ष ग्राहकाला समोरासमोर विकल्या. मग आणखीही काही लोक प्रशिक्षणासाठी पुढे आले.

१९८८ साली ५-६ आठवडे मी ईशान्य भारताच्या दौऱ्यावर गेलो. तिथल्या मणिपूर, नागालँड, आसाम, अरुणाचल, मेघालय, त्रिपुरा या राज्यातील फुटीरवादी चळवळींचा अभ्यास केला. या लोकांना भारतीय संघराज्यातून का बाहेर पडायचे आहे याचा हा शोध होता. राष्ट्र ही संकल्पना किती हिंसेवर आधारित आहे याचे नक्षलवादी चळवळीनंतर पुन्हा एकदा जवळून दर्शन झाले. त्याचबरोबर देशातील 'मुख्य' प्रवाहाचे, 'बहुमता'चे दडपशाही रूपही पाहायला मिळाले. सैन्य ही हिंसेची अधिकृत व जनमान्य संस्था. ती आपल्याच लोकांविरुद्ध उठली की, कोणत्या थराला जाते हेही तिथल्या लोकांच्या प्रत्यक्ष भेटीतून, चर्चांमधून नीट कळले.

पुढे या विषयावर मी अनेक चित्रे काढली. त्यातील काही अशी - फाजील महत्त्व दिलेल्या गोष्टी-रोमान्स, पालकत्व, शरीर (The over-rated (-s) pink, parenthood, body) (चित्र क्र. ८); कमी गांभीर्याने पाहिल्या जाणाऱ्या गोष्टी - विद्वेष (The underrated-hatred) (चित्र क्र. ६); कमी गांभीर्याने पाहिल्या जाणाऱ्या गोष्टी - राष्ट्र ही संकल्पना (The underrated - the nation state) (चित्र क्र. ७); लष्करावर एक चित्र - कोणाच्या तरी बापाला मारायला निघाला (Off to kill someone else's father) (चित्र क्र. ९); अभिजन आणि हिंसा (Elites and violence) (चित्र क्र. १०) या चित्रासंबंधी थोडे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. ते पुढे दिले आहे. ते वाचताना पान १६० व १६१ वर दिलेल्या संबंधित चित्र प्रतिमा संदर्भासाठी पाहाव्या.

क्र. ६ व ७ या चित्रांमध्ये समाजात ज्या गोष्टी, जी मूल्ये गांभीर्याने घेणे आवश्यक आहे, त्या तेवढ्या गांभीर्याने का घेतल्या जात नाहीत या प्रश्नाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. माझ्या मते सांप्रदायिक द्वेष आणि राष्ट्र ही संकल्पना या दोन गोष्टी आपण काळजीपूर्वक तपासायला हव्यात. दंगे होत नाहीत, हिंसाचार होत नाहीत तोपर्यंत आपण सांप्रदायिक द्वेषाबद्दल गाफील राहतो. पण हा खदखदणारा विद्वेष कोणत्याही क्षणी प्रकट होतो व फार मोठी सामाजिक हानी करतो. मग ते हिंदू-मुस्लिम दंगे असोत किंवा दलितांवरचे अत्याचार असोत. 'शांतते'च्या काळातच हे सामाजिक प्रवाह तपासणे आवश्यक असते, तिकडे आपण दुर्लक्ष करतो. (चित्र क्र. ६) 'राष्ट्र' या कल्पनेत खूप हिंसा अनुस्यूत असते. राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम या नावाखाली ही संकल्पना तपासली जात नाही. आपली भौगोलिक सीमा राखणे एवढाच राष्ट्रभक्तीचा आविष्कार नसतो. तर आपला वर्चस्ववाद, आपली संस्कृती इतर दुबळ्या राष्ट्रांवर लादणे, आपल्या देशातील फुटीरतावादी चळवळी दडपणे ही हिंसाही त्यात मान्य धरली जाते. (चित्र क्र. ७) या गोष्टी कमी गांभीर्याने पाहिल्या जाणाऱ्या आहेत.

गंमत अशी की याच बेपर्वाई वृत्तीने इतर काही मूल्यांना मात्र अवाजवी महत्त्व दिले जाते. रोमान्स ही त्यातली एक बाब. 'फाजील महत्त्व दिलेल्या गोष्टी - रोमान्स, पालकत्व, शरीर' (चित्र क्र. ८) या चित्रातील डावी बाजू दोन प्रेमी युगुले दाखवते.

पालकत्व ही दुसरी जादा महत्त्व दिलेली गोष्ट. आत्मकेंद्रितता वाढण्यात मी-माझे कुटुंब यापर्यंत माणसाची नजर बांधून ठेवण्यात पालकत्वाला दिलेल्या सांस्कृतिक मूल्याचा मोठा हातभार आहे. म्हणून चित्रातील मधला भाग हे मूल्य दर्शवतो. त्यात वरती एका नवीन जन्माचा आनंद आहे आणि खाली बाबागाडी ढकलणारा एक बाप आहे. चित्रातील उजवीकडचा भाग एक देहसदृश आकृती दाखवतो. आपली देहबुद्धी आजकाल फार तीव्र झाली आहे. जरा दुस्स झाले की स्पेशालिस्ट डॉक्टरकडे धावा, अनारोग्याची सतत व बहुधा अतिरंजित भीती बाळगा ही वृत्ती वाढीस लागली आहे.

पुढील चित्रांतून समाजाच्या उफराट्या मूल्यव्यवस्थेवर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न आहे.

'कोणाच्या तरी बापाला मारायला निघाला' (चित्र क्र. ९) या चित्रात आपल्या मुलीला कडेवर घेऊन निरोप देणारा एक सैनिक दिसतो. युद्धाबाबतचे उदात्त चित्र आपल्या मनावर एवढे ठसलेले असते की, हा सैनिक दुसऱ्या कोणाच्या तरी मुलाच्या बापाला ठार मारायला निघाला आहे याचा आपल्याला विसर पडतो.

'हिंसा' समाजातील 'खालचा' वर्ग करतो. आम्ही 'सुसंस्कृत'. हा कोणत्याही समाजातील अभिजनांचा आवडता समज असतो. वस्तुत: समाजातील आर्थिक आणि सांस्कृतिक भांडवल बाळगणारा हा वर्ग या हिंसेला अंशत: तरी कारणीभूत असतो. पण हिंसा झाली की, तोच वर्ग ही हिंसा आपल्याला दिसत नाही, असा अविर्भाव घेतो आणि त्याविषयी मौन पाळतो. 'अभिजन आणि हिंसा' या चित्रात हिंसक पशू आणि त्यांचे भक्ष्य दिसते व एक बाई तोंडावर बोट ठेवून डोळे मिटून घेतलेली दिसते. ती या अभिजनांचे प्रतीक आहे. (चित्र क्र. १०)

ईशान्य भारताच्या दौऱ्यावरून परत आल्यावर मी काही संशोधन, काही इंजिनिअरिंगची कामे चालू ठेवली. एकूण सगळेच अभ्यासप्रकल्प विकासाच्या संदर्भातले होते. अशा तुटक अभ्यासांची काही संगती लागावी, समाजाचे अंत:प्रवाह अधिक शिस्तबद्धरीत्या कळावेत या उद्देशाने १९९१ साली मी पुणे विद्यापीठात एम.ए. सोशॉलॉजी करायला दाखल झालो. १९९३ साली मी एम.ए. झालो. मग काही काळ कागदी संशोधनात घालवला. या दोन-तीन वर्षांत सोशॉलॉजीच नव्हे तर एकूणच सामाजिक 'शास्त्रां'ची वास्तव समजून घेण्याची मर्यादा माझ्या लक्षात आली. एकूण संशोधनाची पातळी, इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली किंवा तत्सम 'तज्ज्ञांनी तज्ज्ञांसाठी' चालवलेल्या नियतकालिकांत निबंध/प्रबंध छापून आणण्याचा अट्टाहास - ज्याच्या तळटीपा जास्त, संदर्भ ग्रंथांची यादी लांब तो अधिक तज्ज्ञ - या सगळ्याच प्रकाराचा उबग आला. ब्रिटनमध्ये गेल्यावरही अनेक विद्यापीठे काही कामासाठी मी पालथी घातली, तिथेही हाच अनुभव आला. या उद्वेगाचे प्रतिबिंब पुढे माझ्या अनेक चित्रांत उमटले. 'उसवलेले' या चित्रात पार्श्वभूमीमध्ये रोदाँचा विचारवंत दाखवला आहे. त्याच्या पुढ्यात एका फाटलेल्या पिशवीतून सांडलेल्या भाज्या गोळा करणारी पुढे वाकलेली बाई दिसते. पिशवी आहे Theory. भाज्यांना नावे आहेत. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र वगैरे. समाजाचे प्रश्न सोडवणे दूरच पण ते समजून घेण्यात किंवा मांडण्यात सामाजिक 'शास्त्रांचे' दिवाळे वाजले आहे हा मतितार्थ. हे चित्र (unstuck) Art People Undercurrents मध्ये पाहता येईल.

समाजशास्त्रांचा मला आक्षेपार्ह वाटलेला दुसरा भाग म्हणजे बोलीभाषेत उथळ संकल्पना घुसवायचा त्यांचा उद्योग. या संकल्पना ५-१० वर्षे अगदी प्रत्येकाच्या तोंडी वाक्प्रचार म्हणून येतात आणि नंतर त्यांची सद्दी संपते. अशा संकल्पनांवर टीका करणारी बरीच चित्रे मी काढली.

'स्वत:चे अवकाश' (Private Space) ही अशीच एक संकल्पना. तिची अजूनही चलती आहे. यावर मी दोन चित्रे काढली. दोन्ही एकाच धर्तीची आहेत. त्यातील एकाचे नाव आहे 'तिचे खासगी अवकाश (Private Space - Hers)'. यात उजवीकडे खालच्या कोपऱ्यात झुल्यावर पहुडलेली एक बाई दिसते. सोबतीला तिचा पाळीव कुत्रा आहे. बाजूच्या चित्रात शोक करणाऱ्या स्त्रिया, युद्धावर निघालेल्या स्त्रिया दिसतात. बाहेरच्या जगात एवढा हिंसाचार चालू असताना या बाईचा असा खासगी कोपरा असू शकतो का, तिला तो अधिकार तरी असू शकतो का हा प्रश्न हे चित्र विचारते. (चित्र क्र. ११)

उदारमतवादी राजकीय धोरणांचा 'लोकांना निवडीचे स्वातंत्र्य द्या' हा एक घोष असतो. Freedom of Choice ही आणखी एक पोकळ संकल्पना. त्यावर एक चित्र आहे - 'निवडीच्या स्वातंत्र्याच्या धुंदीत लोळताना.' (निवडीचे स्वातंत्र्य) (Wallowing in the freedom of choice) हे चित्र Art People Undercurrents मध्ये पाहता येईल. (चित्र क्र. १२) यात आपल्याला सापशिडीच्या खेळाचा पट मागे दिसतो. त्यातील घरांना नावे आहेत - जात, धर्म, लिंग, देश वगैरे. यातल्या कोणत्याच गोष्टीत खरेतर आपल्याला निवडीचे स्वातंत्र्य नसते. मॅक्डोनाल्डमध्ये जायचे का पिझ्झा हटमध्ये जायचे हे काही निवडीचे स्वातंत्र्य नव्हे, किंवा पाणी पिऊन भूक मारायची का पाणी न पिता भूक मारायची हेही निवडीचे स्वातंत्र्य नव्हे.

अशा अनेक संकल्पनांवर मी चित्रे काढली. पण मुख्यत: माझा भर सामूहिक वेदनांच्या चित्रणावर राहिलेला आहे.

१९९४ साली ब्रेमेन नावाच्या एका जर्मन विद्यापीठाने एक

शिष्यवृत्ती देण्याचे जाहीर केले. एम.ए. सोशॉलॉजी नंतरच्या अभ्यासासाठी ही शिष्यवृत्ती होती. अभ्यास तिथे जाऊन करायचा होता आणि प्रबंधही जर्मनमध्ये लिहायचा होता. म्हणून त्या लोकांनी जर्मन भाषा उत्तम शिकण्याची अट घातली. एक वर्ष मी त्यात घालवले. नंतर अगदी सहजपणे शिष्यवृत्ती देणे जमणार नाही, असे त्या विद्यापीठाच्या प्रोफेसरबाईंनी दोन ओळीच्या पत्राने कळवले. एकूण समाजशास्त्र मंडळींचा बेजबाबदारपणा मी अनुभवला होताच, त्यात पहिल्या जगाच्या तिसऱ्या जगाच्या बद्दल तुच्छतेच्या अनुभवाची भर पडली. पुढे ब्रिटनमधल्या वास्तव्यात हा अनुभव अधिकच पक्का झाला.

१९९५ सालच्या अखेरीला मी ब्रिटनला गेलो. तिथे पहिला हादरा दिला त्यांच्या स्थलांतरितांच्या नियमांनी. त्यांनी मला ब्रिटनमध्ये नोकरी-धंदा करायलाच मनाई केली. माझी पत्नी उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी १९९५ च्या सुरूवातीलाच तेथे गेली होती. पुढची चार-पाच वर्षे माझ्यावर ही मनाई कायम राहिली. पत्नीचे नोकरीचे ठिकाणही दर सहा महिन्यांनी बदलत असे. मँचेस्टर, शेफील्ड, पेस्ली अशा बऱ्याच ठिकाणी आम्ही चार-सहा महिने रहायचो आणि पुढे सरकायचो. त्यामुळे कुठेच अगदी विनावेतन कामही मला पाहता येत नसे. तिथे जर्मन भाषेचे शिक्षणही मी चालू ठेवले. भाषा हा पहिल्यापासून माझ्या आवडीचा विषय. ललित साहित्याचे माझे वाचन मराठी, संस्कृत, हिंदी, इंग्रजी आणि जर्मन या भाषांत बऱ्यापैकी होते. पण ललित साहित्य लिहिणे हा काही माझा पिंड नाही. या वाचनाचा परिणाम म्हणून जागतिक दर्जाच्या अनेक वाङ्मयकृतींवर आधारित चित्रे मी पुढे काढली. उदा. डोस्टोयवस्कीच्या 'द इडियट' कादंबरीतील तीन व्यक्तिरेखांचे चित्रण - प्रिन्स मिश्किन, रोगोझिन आणि नास्तास्या फिलिपोवना. यातील प्रिन्स मिश्किनवरील चित्र लंडनच्या एका प्रकाशकाने 'द इडियट' वरील एका पुस्तकासाठी वापरले. व्लादिमीर नाबोकोव या माझ्या सगळ्यात आवडत्या इंग्रजी लेखकाच्या दोन कादंबऱ्यांवर आधारित चित्रे (Speak, Memory) आणि (Transparent Things), नोवालिस या जर्मन कवीच्या Hymns to the Night वरील चित्र, वगैरे. ही चित्रे Art Other Portrayals मध्ये पाहता येतील.

विकसित देशातील समृद्धी, स्वच्छता, रस्ते-वीज-पाणी-फोन या मूलभूत नागरी सुविधा या वरवरच्या गोष्टी झाल्या. त्या कोणत्याही पर्यटकाला दिसतात. पण या समाजाची आत्मकेंद्रितता, अविकसित जगाबद्दलचे अज्ञान व तुच्छता, त्यांचा स्वत:बद्दलचा न्यूनगंड, राजकीय नेतृत्वाची अल्पदृष्टी, नैतिकतेचा अहंकार, त्यातून येणारी युद्धखोरी या सगळ्याच गोष्टींवर भाष्य करण्याची मला निकड वाटू लागली. यात एक बाब लक्षात घ्यायला हवी. ती म्हणजे, तिथल्या लोकांचे सामाजिक अभिसरण मर्यादित असते. त्यात आम्ही उपरे. समानधर्म तर सोडाच, पण परका माणूसही वर्षानुवर्षे भेटणे दुरापास्त होते. त्यामुळे लेखाच्या सुरूवातीला उल्लेख केलेली संवादाची जरूरी दिवसेंदिवस तीव्र होत गेली.

याच सुमारास शाब्दिक भाषा हे संवादाचे माध्यम म्हणून कितपत परिणामकारक आहे याबद्दल मी साशंक होऊ लागलो. एक संकल्पना मी लेखातून मांडायची तर त्यातल्या अनेक शब्दांचा, वाक्प्रचारांचा मला अभिप्रेत असणारा अर्थ मी सविस्तर देणे आवश्यक असते. तेव्हा कोठे, मला काय म्हणायचे ते लोकांपर्यंत पोचू शकते. वर म्हटल्याप्रमाणे अगदी मामुली थरावर भाषा उपयोगी असते, त्याहून जरा खोलात गेलो तर संवादापेक्षा गोंधळच जास्त माजतो. 'मला वाचायला चष्मा लागतो' हे विधान मी केले, तर ऐकणाऱ्याला ते नि:संदिग्धपणे कळू शकते. पण 'काल रात्री आकाश सुंदर दिसत होते' हे दुसरे विधान पाहू. ऐकणाऱ्यानेही काल रात्री आकाश पाहिले होते. त्यालाही ते सुंदर वाटले होते. पण 'सुंदर' म्हणजे काय याची त्याची आणि माझी व्याख्या निराळी असण्याची शक्यता जास्त. परत या 'सुंदर'चे माझे अन्वयार्थ मी सांगायला लागलो तर नवी विशेषणे वापरणार आणि गोंधळ वाढवणार. 'शब्द द्वैत माजवतो' हे प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातील विधान (बहुतेक रामानुजाचार्यांचे) भाषेची ही मर्यादा सांगते. तात्पर्य, एखाद्या विधानावर (काल रात्री आकाश सुंदर होते) माझी आणि ऐकणाऱ्याची संमती असली तरी मी म्हणतो त्या अर्थाने संवाद होत नाही. बोलणाऱ्याची किंवा लिहिणाऱ्याची एखाद्या शब्दामागची संदर्भ चौकट एक असते आणि ऐकणाऱ्याची किंवा वाचणाऱ्याची संदर्भ चौकट दुसरी असते. शब्द उलटे करून पाहिले तर कासवाच्या पोटासारखे बुळबुळीत आणि घसरडे असतात अशा अर्थाचे वाक्य जी.ए. कुलकर्णींच्या एका कथेतील एक व्यक्ती म्हणते.

उदाहरणार्थ मी भारतीय, बहुतेक आयुष्य पुण्या-मुंबईत गेलेले. गेली दहा-बारा वर्षे ब्रिटनमध्ये. इंग्रजी येते पण जेव्हा मी एखाद्या संकल्पनेवर तिथल्या ब्रिटिश माणसांशी चर्चा करतो तेव्हा मला जाणवते की, आमच्या संदर्भ चौकटीच निराळ्या आहेत. शब्द तेच असतील पण अर्थ निराळे आहेत. बहुतेक वेळा संवादातील अंतर व्यक्तिविशेषापेक्षा भाषेच्या त्रुटींमुळे निर्माण होते. काही तासांच्या विमानाच्या प्रवासाच्या अंतरावर किंवा इंटरनेट, टीव्हीच्या तत्क्षणी होणाऱ्या दर्शनाने किमान एवढे तरी कळते की, जगात १०० कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत, पाण्यासाठी ते रोज पिढ्यान्‌पिढ्या मैलन् मैल तुडवतात. स्वच्छ हवा, पाणी हीच चैन आहे. पण हे विकसित देशातील

लोकांना कळूनच घ्यायचे नसते आणि हीच चैन या तिसऱ्या जगाच्या जिवावर चालली आहे याची जाणीवही नसते. युद्धे तिसऱ्या जगात होतात. बेजबाबदार सरकारे तिसऱ्या जगात असतात. फारतर एखाद्या चॅरिटीला आपण अधूनमधून एखादे दान देऊ आणि आपले हात झटकून टाकू ही उथळ भावना त्या समाजात रूजली आहे.

या विषयावर माझे एक चित्र आहे, या चित्राचे नाव आहे -

'फॅशन - शरीरासाठी, सदसद्विवेकबुद्धीसाठी' (Fashion accessories for your body, for your conscience) चित्रात 'शॉपिंग' करून आलेली एक स्त्री दिसते. ती आता त्या कपड्यांनी आपला देह झाकणार. खाली एक पुरुषही नवीन पँट न्याहाळताना दिसतो. उजवीकडे एक दानपेटी आहे. तिच्या बाजूंवर निरनिराळ्या स्वयंसेवी संघटनांची नावे आहेत. वरती एखादे नाणे त्यात टाकणारा हात आहे. (चित्र क्र. १३)

चित्रांबद्दलचे हे थोडे विषयांतर करून परत चित्रप्रवासाकडे वळू. सप्टेंबर २००१ ला न्यूयॉर्कमध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटरवर मुस्लीम दहशतवाद्यांनी हल्ला केला. या घटनेने जग हादरले. पण जणू काही प्रलयच झाला असे वातावरण पश्चिमेकडील देशांनी निर्माण केले. जगबुडीची वेळ आल्याचा निर्वाळा राजकीय नेते, सरसकट सगळी प्रसारमाध्यमे - वर्तमानपत्रे, टीव्ही, रेडिओ आणि इंटरनेट - टाहो फोडून दिवसेंदिवस देऊ लागली. घटना सनसनाटी होती, पण पहिल्या जगाची आत्मकेंद्रितता, आम्ही म्हणजेच जग हे गृहीत स्तिमित करणारे होते. त्याची कारणे अनेक आहेत. एकतर दुसऱ्या महायुद्धानंतर अशा मोठ्या प्रमाणावरच्या नरसंहाराची पश्चिमेला सवय नाही. महायुद्धानंतरच्या दोन पिढ्यांना त्या नरसंहाराचाही विसर पडला आहे. त्यात अमेरिकेवर हल्ला म्हणजे पोटात गोळा उठण्यासारखीच परिस्थिती. कारण युरोपमधले अमेरिकेचे लष्करी तळ हा युरोपच्या संरक्षणाचा मोठा भाग आहे. रशियाच्या विघटनानंतर अमेरिका हीच सर्वेसर्वा जागतिक ताकद या घटनेपर्यंत पश्चिमेत मानली जात असे. त्या विश्वासाला हा चांगलाच हादरा बसला. आफ्रिकेतील टोळीयुद्धे, दक्षिण अमेरिकेतील अंमली पदार्थांच्या व्यापारातील गँगवॉर्स, आपल्याकडचे ग्रोधासारखे हत्याकांड, नंदीग्राम खम्ममधले डझनावारी मृत्यू वगैरे हिंसाचाराची उर्वरित जगाला जशी सवय आहे तशी तेथे नाही. त्यामुळे हा गदारोळ झाला.

यानंतर लगेच ऑक्टोबर महिन्यात आम्ही घरचे लोक कॅनडा, अमेरिकेला सुट्टीसाठी गेलो. ऑटम या ऋतूतले कॅनडाच्या निसर्गातले रंग अतिशय सुंदर असतात. केशरी, किरमिजी, लाल, पिवळी वनराई शेकडो मैल पसरलेली असते. त्याचवेळी अफगाणिस्तानात अल्-कईदाविरुद्धच्या मोहिमेत अमेरिका हेच रंग उधळत होती आणि अनेक निष्पापांना ठार मारत होती.

स्कॉटलंडला परत आल्यावर 'ऑटम २००१' हे पहिले चित्र मी नोव्हेंबर २००१ ला काढले. त्यानंतरचे दुसरे चित्र याच विषयावर होते. त्याचे नाव 'अमेरिकेने पेरले, धर्मनिष्ठांनी पेरले - निष्पापांनी भोगले.' पहिल्या चित्रात(autumn) एकीकडे कॅनडाचा सुंदर निसर्ग आणि दुसरीकडे युद्धात निर्वासित झालेले अफगाण दाखवले होते. दुसऱ्या चित्रात एकीकडे वर्ल्ड ट्रेड सेंटरवरचा हल्ला आणि दुसरीकडे युद्धानंतरची अफगाण परवड दाखवली होती. Autumn 2001 - Canada/Afghanistan आणि Believers sow, America sows – Innocents reap ही दोन्ही चित्रे Art People Pathology मध्ये पहायला मिळतील. माझी सुरूवातीची चित्रे अशी 'हे चित्र विरुद्ध ते चित्र' अशी आहेत. खाण्याची वानवा नसलेली पण चुकीच्या आहाराने लठ्ठपणाचा विकार झालेली पश्चिमेतील माणसे आणि अन्नान्नदशा होऊन मरत असणारी पूर्वेतील मुले या विषयावर 'Food and lack of it' (अन्न आणि त्याचा अभाव) हे चित्र होते. (Art People Undercurrents). 'युद्ध' (War) या एका चित्रात रामायण-महाभारतापासूनची आजवरची युद्धे दाखवली. (Art People Pathology) 'असमांतर' या चित्रात धार्मिक कलह हिंसेत कसे परिवर्तित होतात हे दाखवले. ('They don't stay parallel' - Art People Undercurrents)

अशी काही चित्रे झाल्यावर नवीनच प्रश्न सुरू झाला. अभिव्यक्तीला तर चित्रभाषेत सुरूवात झाली, पण संवादाचे काय? परत या कोलाज थाटाच्या ठिगळकामाला 'चित्र' म्हणता येईल का हाही प्रश्न होता. मग ही दहा-बारा चित्रे घेऊन मी तेथील आर्ट कॉलेजच्या शिक्षकांना भेटायला गेलो. त्यांनी एक नजर टाकली आणि ही चित्रेच नाहीत असे जाहीर केले. रंगसंगती, मांडणी, छायाप्रकाश अशा अनेक बाबतीत मी अनभिज्ञ आहे हे बजावून सांगितले आणि पहिल्यापासून रेखाटन व रंगकाम शिकावे अशी सूचना केली. पत्रव्यवहाराने करता येणाऱ्या अशा कोर्सची मी चौकशीही केली. एकतर तो अतोनात महाग होता आणि दुसरे म्हणजे मला त्यात रसच नव्हता. मला काही आर्किटेक्ट व्हायचे नव्हते किंवा हुबेहुब चित्रे काढणारा कामगार. मला सामाजिक विषतेचे चित्रण चित्रांद्वारे करून लोकांपर्यंत पोचवायचे होते. त्यासाठी तांत्रिक शिक्षणात घालवायला मला वेळ नव्हता. पुढे तर हे तांत्रिक शिक्षण- कोणत्याही गोष्टीचे शास्त्र बनवणे - ही प्रक्रिया उत्स्फूर्तता मारते असेच माझे मत बनले. इतर कलाप्रकारांबद्दल संगीत-नृत्य-नाटक बोलण्याचा माझा अधिकार नाही, पण निदान चित्रकला हा तरी उत्स्फूर्त आविष्कार असावा, ती शाळेत/कॉलेजात शिकण्याची आणि शिकवण्याची गोष्ट नसावी हे माझे मत आहे.

'तज्ज्ञांच्या' तावडीतून एखादा विषय तरी सुटावा! मग पुढच्या भारतभेटीत मी ही काही चित्रे बरोबर घेऊन आलो. पुण्यातल्या प्रस्थापित चित्रकारांना भेटलो. त्यांनीही नाके मुरडली. सुदैवाने त्याच वेळी मी माझे जवळचे मित्र मिलिंद सोमण यांनाही भेटलो. सोमण पारंपारिक शैलीचे निसर्ग चित्रकार. पण त्यांनी आहे त्या परिस्थितीत (!) चित्रे म्हणून ती कशी सुधारता येतील याच्या मौलिक सूचना केल्या. माझे दुसरे मित्र नाटककार मकरंद साठे यांनाही ही चित्रे दाखवली. त्यांनी 'या प्रस्थापित चित्रकारांचे ऐकू नको, तुझा उपक्रम चालू ठेव' असे स्पष्ट सांगितले आणि माझा कलाप्रयोग चालू राहिला. या काळात स्कॉटलंडमध्ये माझी ५-६ वर्षांची मुलगी हीच हक्काची प्रेक्षक आणि टीकाकार असे.

पुढच्या काही महिन्यांत माझ्यासारख्या कलेच्या प्रमुख स्रोताबाहेर असलेल्या चित्रकारांना प्रोत्साहन देणाऱ्या स्कॉटलंडमधल्या एका संघटनेचा मला शोध लागला. या संदर्भात विकसित देशात सामिलीकरण (co-option) ही प्रक्रिया कशी चालते ते पाहण्यासारखे आहे. या संघटनेला अनुदान सरकारकडून मिळत असे. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध निषेध करण्यासाठी व्यवस्थाच मदत करत असे!

या संघटनेने एडिंबरा या स्कॉटलंडच्या राजधानीत एक देखणी गॅलरी भाड्याने घेतली होती. तिथे दर दोन महिन्यांनी एक प्रदर्शन भरत असे. त्यात दहा-बारा कलाकारांची प्रत्येकी तीन-चार चित्रे दाखवण्यात येत. ग्लासगो या स्कॉटलंडमधील सगळ्यात मोठ्या शहरातही अशीच एक समांतर कलेला प्रोत्साहन देणारी संघटना होती. तेथेही मी काही प्रदर्शनात भाग घेतला. २००३ ला ग्लासगोच्या आंतरराष्ट्रीय कलामहोत्सवात या संघटनेतर्फे माझी वीस चित्रे एकावेळी दाखवण्यात आली.

या प्रदर्शनांतून एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली. हा सांस्कृतिक भेद असावा. प्रदर्शनाला पाहायला येणारे शवपेटीसमोरून जावे अशा गंभीरपणे व मूकपणे चित्रांसमोरून जात असत. तिथे कलाकार असूनही ना कोणी बोलत असे, ना अभिप्राय पुस्तिकेत नोंद करत असे! पुढेपुढे मी प्रदर्शनादरम्यान हजर राहणेच बंद केले. प्रदर्शनाच्या आधी एक दिवस चित्रे पोचवायला जावे, प्रदर्शन सुरू झाल्यावर ते बघायला एक दिवस जावे आणि प्रदर्शन संपल्यावर चित्रे परत आणायला जावे असाच क्रम मी ठरवून टाकला. एकतर एडिंबरा किंवा ग्लासगो आमच्या राहत्या शहरापासून दूर आहेत. दोन्ही शहरांत मोटार पार्क करणे हे अशक्यप्राय. मग घरून रेल्वे स्टेशनला टॅक्सी, त्या ठिकाणच्या रेल्वे स्टेशनपासून गॅलरीपर्यंत टॅक्सी हा मोठाच भुर्दंड असे. चित्रे परत आणणे तर आणखीच जिकीरीचे असे. त्या गॅलरीतून बाहेर पडले की, रेल्वे स्टेशनला यायला टॅक्सीच मिळत नसे. दहा-दहा किलोची तीन-चार चित्रे कशीबशी टेकवत टेकवत दोन-चार मैल चालत आणावी लागत. त्यात ब्रिटनमध्ये पाऊस पाचवीला पुजलेला. चित्रे भिजू नयेत म्हणून प्लॅस्टिकमध्ये गुंडाळलेली असत. तुफान वाऱ्याने ते प्लॅस्टिक फाटत असे. कडाक्याच्या थंडीत बोटे वळत, चित्रे धड धरताही येत नसत!

पण माझा अर्थार्जनाचा प्रश्न जसा ब्रिटिश सरकारने मनाई घालून चुटकीसरशी संपवला तसाच हाही प्रश्न अचानक संपला. एडिंबराच्या गॅलरीत कोणीतरी अफरातफर केली किंवा त्यांचे सरकारी अनुदान बंद झाले. त्यामुळे ती गॅलरीच बंद झाली. ग्लासगोची संघटना एका उत्साही बाईवरच चालत असे. तिचे व्यवस्थापनाशी मतभेद विकोपाला जाऊन तिने ती नोकरीच सोडून दिली आणि ग्लासगोही बंद झाले. तोपर्यंत मलाही या एकूण मूकबधिरांसाठी करायच्या खर्चिक खेळाचा कंटाळा आला होता. संवादच होत नसेल तर प्रदर्शनांचा मला काहीच उपयोग नव्हता.

२००३ साली अपवाद म्हणून ग्लासगोच्या महोत्सवात या महोत्सवाचे प्रमुख योगायोगाने पहिल्याच दिवशी आमच्या गॅलरीत आले. महोत्सवात ३०-३५ ठिकाणी विविध कलाप्रदर्शन महिनाभर ग्लासगो शहरभर चाले. त्यामुळे हा योग मोठाच म्हणायचा. या गृहस्थांनी निदान सगळी चित्रे व्यवस्थित पाहिली आणि त्यावर माझ्याशी एक-दीड तास चर्चाही केली. २००१ ते २००४ या तीन वर्षांत मला माझ्या कामावर मिळालेला तो एकमेव अभिप्राय.


एडिंबराच्या गॅलरीत बाकी कलाकारांशी संपर्क ठेवण्याचा मी प्रयत्न केला. पण ती सगळी मंडळी निराळेच इंग्रजी बोलत! बरेचसे व्यसनाधीन किंवा नुकतेच व्यसनमुक्त झालेले, रस्त्यावर राहणारे कलाकार होते. त्यांना सामाजिक बांधिलकीचे तसे काही घेणे नव्हते. प्रदर्शनात एखादे चित्र विकले गेले तर त्या दिवशी संध्याकाळी मित्रमंडळींबरोबर दारू पिऊन मजा करायची एवढीच त्यांची प्रदर्शनातून आणि एकूण कलेबद्दल अपेक्षा होती. त्या समाजातला तळातला थर मात्र मला या निमित्ताने पाहायला मिळाला. माझे बहिष्कृत (drop-outs) (Art People The Marginalised) हे चित्र या प्रकारच्या लोकांवर आहे. या काळात ग्लासगोच्या एका प्रदर्शनात मला एक इटालियन तरुणी भेटली. ती वेबसाईट डिझाइन करण्याचे कामही करत असे. तोपर्यंत माझी शंभर एक चित्रे झाली होती आणि प्रत्यक्ष प्रदर्शनाच्या शक्यता संपुष्टात आल्या होत्या. तिने माझी वेब-साईट असावी असा आग्रह धरला. ती फार उत्साही. ग्लासगोहून माझ्या घरी आली. (तिकडे कोणी कोणाच्या घरी जाणे ही फार क्वचित



१. कुजबुज



२. संभाषण



३. सिंहावलोकनात सगळी कोडी सुटतात



४. गरजा चैन नव्हे



५. दारिद्र्य हे आणि ते





६. कमी गांभीर्याने पाहिल्या जाणाऱ्या गोष्टी – विद्वेष





७. कमी गांभीर्याने पाहिल्या जाणाऱ्या गोष्टी – राष्ट्र ही संकल्पना




८. फाजील महत्त्व दिलेल्या गोष्टी – रोमान्स, पालकत्व, शरीर



१०. अभिजन आणि हिंसा



११. तिचे खाजगी अवकाश



९. कोणाच्या तरी बापाला मारायला निघाला




१२. निवडीचे स्वातंत्र्य




१३. फॅशन – शरीरासाठी व सदसद्विवेक बुद्धीसाठी

घडणारी गोष्ट असते. ब्रिटिश तर त्याबाबत फारच खडूस. याच्या घरी गेलो तर याला परत घरी बोलवायला लागेल या धसक्याने कोणी कोणाकडे फारसे जात नाही. या पार्श्वभूमीवर ही घटना लक्षात घ्यावी.) तिने सगळ्या चित्रांचे तिच्या डिजिटल कॅमेऱ्यावर फोटो काढले. तेव्हा माझ्याकडे डिजिटल कॅमेरा नव्हता. कॅमेऱ्याची मेमरी कमी म्हणून तिने लॅपटॉपही बरोबर आणला होता. हे काम दिवसभर चालले. मग माझी वेबसाईट करून दिली. या सगळ्या गोष्टी करणे एरवी मला तिथे परवडूच शकले नसते. तिने या कामाचा काही मोबदलाही घेतला नाही.

वेबसाईट झाल्यावर मला एकदम नवीन जग खुले झाले. अक्षरश: जगभरातून चित्रांवर प्रतिक्रिया येऊ लागल्या. अमेरिका, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी या विकसित देशांतून तर आल्याच; पण इस्रायल, फिलीपिन्स, अर्जेंटिना, चिली अशा कानाकोपऱ्यातूनही येऊ लागल्या. मग प्रत्यक्ष चित्रे दाखवायची माझी निकड बरीच कमी झाली. वेबसाईट चालवणे हा प्रकार चित्रे प्रदर्शनात दाखल करण्यापेक्षा स्वस्तही होता आणि घरी बसून सांभाळण्यासारखाही होता. चार इंच बाय चार इंच चित्राच्या प्रतिमेवर लोक मनापासून प्रामाणिकपणे अभिप्राय देतात, शंका विचारतात, चर्चा करतात ही अतिशय दिलासा देणारी गोष्ट होती. संवाद हा माझ्या कलाप्रयोगातला एक भाग तर काही अंशी पार पडला. दुसरा भाग कला लोकांपर्यंत पोचवणे. तोही वेबसाईटमुळे काही प्रमाणात पुढे सरकला. आजही वेबसाईट हेच माझे लोकांपर्यंत पोचण्याचे प्रमुख साधन आहे. (www.art-non-deco.com)

इतर मार्गाने चित्रकला लोकांपर्यंत पोचवणे यातल्या अडचणीही मला उमगायला लागल्या. प्रत्यक्ष गॅलरी गाठणे, चित्राला फ्रेम करणे, ती चित्रे गॅलरीच्या मालकांना दाखवणे हा त्यातला शारीरिक भाग झाला. दुसरा जास्त कठीण भाग म्हणजे समाज आणि चित्रकार यातील दरी. प्रस्थापित महागड्या चित्रकारांना यातून वगळू. कारण त्यांचे नाव झालेले असते आणि त्यांची चित्रे विकत घेणे हा प्रतिष्ठेचा प्रश्न असतो. आपल्याकडे किती पैसे आहेत हे इतरांना दाखवण्याचा तो प्रयत्न असतो. दुर्बोधता आणि वैयक्तिक भावविश्व यांना अशा चित्रांत प्राधान्य असते. हे विवेचन त्या चित्रकारांबद्दल किंवा त्या ग्राहकांबद्दल नाही. इतर चित्रकार आणि त्यांचे प्रेक्षक यांबद्दल आहे. एका बाजूला सामान्य माणूस म्हणतो 'मला चित्रकलेतले काही कळत नाही.' दुसऱ्या बाजूला चित्रकार म्हणतो, 'माझी चित्रे लोकांना कळत नाहीत.' या दोन्ही भूमिकांमागे दोघांचाही थोडा अहंभाव असतो. चित्र कळून घेण्याची तसदी कशाला घ्यायची हा प्रेक्षकाचा अहंभाव. कोणीतरी एखादे चित्र काढण्यासाठी किमान काही आठवडे श्रम घेतो, त्याला काहीतरी सांगायचे आहे म्हणून ते तुमच्यासमोर मांडतो, फक्त चित्र काढणे नव्हे तर फ्रेम करणे, गॅलरी शोधणे, प्रदर्शनपूर्व प्रसिद्धी देणे यासाठी वेळ आणि श्रम खर्च करतो ही संवेदनाच 'सामान्य' माणूस नाकारतो. आपले मनच त्या दृष्टीने बंद करतो. चित्रांसाबतचे आपले अज्ञान आपण मोकळेपणाने 'जाहीर' करत आहोत या भूमिकेमागे हा अहंभाव असतो.

दुसऱ्या बाजूला मी 'कलावंत', मी फक्त चित्रे काढणार, बघणारे बघतील, कळणारे कळून घेतील; नाहीतर द्या सोडून असा चित्रकाराचा अहंभाव असतो. प्रथम एक गोष्ट स्पष्टपणे समजावून घेतली पाहिजे. कोणतीही कलाकृती किंवा लिखाण निर्माण करणे हा एक भाग झाला. त्यामागे निर्मितीची कळकळ, अभिव्यक्तीची निकड या गोष्टी असतात. इथपर्यंतच कलाकाराला समाधान असेल, तर तो कविता लिहिल, कादंबरी लिहिल, चित्र काढेल आणि प्रकरण तेथेच थांबेल. बहुधा असे घडत नाही. त्यापुढची पायरी म्हणजे आपली कलाकृती लोकांपर्यंत पोचवणे. त्यासाठी चित्रकार काय प्रयत्न करतो? कला निर्माण करण्याएवढीच ती लोकांपर्यंत पोचवणे ही जबाबदारीही चित्रकाराचीच आहे. हे लक्षात आल्यावर मी वेबसाईटवर लक्ष केंद्रित केले. आजवर माझी २०० हून अधिक चित्रे आहेत. अगदी एखादी गॅलरी, एखादा स्पॉन्सर मिळाला तरी सगळी चित्रे निरनिराळ्या ठिकाणी दाखवणे अशक्य आहे. त्याला वेबसाईट हे चांगले उत्तर आहे.

दोन वर्षांपूर्वी पुण्याच्या एका कंपनीने माझ्या काही चित्रांची सीडी-रॉमही काढली. त्यात माझी सुरूवातीची ४५ चित्रे आहेत आणि प्रत्येक चित्रावर माझी मराठी आणि इंग्रजीत कॉमेंटरी आहे. भारतात त्याच्या मार्केटिंगचा मला फारसा प्रयत्न करता आलेला नाही. पण ब्रिटनमध्ये काही ओळखीच्या लोकांना मी ती सीडी रॉम पहायला दिली. त्यातल्या एका फ्रेंच बाईने ती पाहिली आणि म्हणाली हे जणू गॅलरीच माझ्या घरात असल्यासारखे आहे. एखादे चित्र मला पहायचे असेल तर मी ते कधीही यावर पाहू शकते. म्युझियममधलं चित्र पहायचं तर परत तिथं जा, तिकीट काढा हा व्याप असतो. गॅलरीतलं प्रदर्शन संपलं की, चित्र परत पाहायची संधीही जाते. कला लोकांपर्यंत पोचवण्याचा माझ्या प्रयत्नातला हा आणखी एक टप्पा.

या दोन्ही गोष्टी, वेबसाईट आणि सीडी रॉम या कॉम्प्युटर असणाऱ्यांनाच पाहणे शक्य आहे याची मला जाणीव आणि बोच आहे. परंतु स्वखर्चाने एक फिरते प्रदर्शन गावोगावी नेण्याखेरीज मला दुसरा पर्याय सध्या तरी दिसत नाही.

२००४ च्या डिसेंबरमध्ये पुण्याच्या 'सु-दर्शन' कलादालनात मी ४०-४५ चित्रांचे भारतातील पहिले प्रदर्शन भरवले. प्रदर्शनांची पुण्यातली पद्धत वेगळी, ब्रिटनमधली वेगळी.

ब्रिटनमध्ये एक प्रदर्शन ६-७ आठवडे तरी रोज नियमित १० ते ५ चालते. मग कोणी ते पाहायला येवो अगर न येवो. ब्रिटनहून भारतात एवढी चित्रे आणणे खर्चाचे काम. आल्यासरशी दोन आठवडे तरी प्रदर्शन भरवावे ही माझी कल्पना, तर काही लोकांनी मला वेड्यातच काढले! त्यांच्या मते प्रदर्शन फारतर आठवडाभर. त्याचे तर्कशास्त्र मला कळलेले नाही. 'यायचे ते तेवढ्या वेळात येतील' ही कृतक् बेपर्वाई यामागे असावी. कृतक् अशासाठी की, लोक यायला तर हवे असतात! पुण्यातले ते प्रदर्शन प्रत्यक्ष प्रेक्षकांशी चर्चा, त्यांचे अभिप्राय या दृष्टीने मात्र खूपच दिलासा देणारे होते. आपले म्हणणे लोकांपर्यंत पोचते आहे ही गरज ब्रिटनमधल्या दहा वर्षांत वीस प्रदर्शनांनी भागली नव्हती ती पुण्यातल्या एका प्रदर्शनाने भागवली.

२००५ पासून माझ्या चित्रांचा वापर ब्रिटनमधील शैक्षणिक नियतकालिकेही करू लागली. विकासशिक्षण या विषयावर मी चित्रे समोर ठेवून सेमिनार्स, वर्कशॉप्स्ही घेतो. लोकांपर्यंत काही मर्यादित स्वरूपात तरी पोचायला सुरूवात झाल्यासारखे वाटते.

या वर्षीच्या जुलै-ऑगस्टमध्ये भारतातील दुसरे प्रदर्शन मी परत सु-दर्शनमध्ये भरवले. या वेळी चित्रांबरोबर एक स्पष्टीकरणाची पुस्तिका देण्याचा प्रयोग केला. एरवी पाच मिनिटांत प्रदर्शनाची पाहणी करून जाणारा प्रेक्षक आता साधारणपणे ३०-४० मिनिटे हे प्रदर्शन पाहायला घेत असे, खुलासा वाचून चित्रे गांभीर्याने पाहत असे, म्हणजे कलाकाराने प्रयत्न केल्यास लोक चित्रकला अभ्यास करून पाहतात हे बघून मला बरे वाटले.

या प्रदर्शनाचा प्रेक्षकवर्गही गुणात्मकदृष्ट्या निराळा होता. आधीच्या प्रदर्शनाला जवळजवळ सगळीच मंडळी मध्यमवर्गीय शहरी होती. या प्रदर्शनाला त्यांच्याबरोबरच ग्रामीण भागातील विविध सामाजिक चळवळींचे तरुण कार्यकर्ते आले. कबीर कला मंच, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सत्यशोधक समाज, छात्रभारती यांच्यासारख्या संघटनांचे प्रतिनिधी आले व चित्रे आवडल्याचे त्यांनी आवर्जून नोंदवले. हे एक पाऊल पुढे म्हणायला हवे. अशा एका प्रेक्षकाची प्रातिनिधिक प्रतिक्रिया - 'जीवनासाठी कला हा पक्ष उचलून धरून वास्तव जीवन प्रखरपणे दाखवण्याचा व वेगळ्या मार्गाने जाण्याचा आपला ॲप्रोच आवडला. कारण कोणीही निष्पक्ष नसतो. प्रत्येकाचा पक्ष असतो. तुम्ही तुमचा पक्ष निवडलाय... तुम्ही शोषितांचे कलाकार आहात...'

गेली सहा वर्षे मी चित्रे काढत आहे. या काळात कला आणि सौंदर्य याबाबतची माझी भूमिका उत्तरोत्तर स्पष्ट होत गेली. निदान माझ्या चित्रकलेचा तरी रूढ अर्थाने सौंदर्याशी काही संबंध नाही. माझा तो प्रयत्नही नाही. चित्रकार म्हणून मी ओळखला जावा ही माझी महत्त्वाकांक्षाही नाही. सौंदर्याच्या व्याख्येत दोन प्रश्न उभे राहतात. एकतर ती स्थलकालसापेक्ष व्याख्या होते. सौंदर्याच्या भारतीय, युरोपियन आणि अमेरिकन कल्पना निराळ्या आहेत हे मी या प्रदेशात प्रत्यक्ष पाहिलेल्या पिकासो, गोया, व्हॅन गॉगपासून सगळ्या मोठ्या चित्रकारांच्या कलाकृतींवरून सांगू शकतो. आफ्रिकन, चिनी वगैरे इतरांच्या सौंदर्याच्या कल्पना आणखी निराळ्या असतील. त्यामुळे त्या व्याख्येला तसा त्रिकालाबाधित अर्थ नाही. दुसरे आणि आणखी महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही समाजात सौंदर्याची व्याख्या त्या-त्या समाजातील अभिजन (Elite) बनवतात. मग त्यात तरलता, मृदुता, संदिग्धता, विदग्धता येते. माणसे माणसांना ठार मारतात, घाणीत, उपाशी पोटी आयुष्य काढतात, पाण्यासाठी वणवण करतात. यात काहीही तरल, मृदू अथवा संदिग्ध नाही. माझे काम (त्याला कला म्हणणेही मला पसंत नाही) या संदर्भात आहे.

माझे काम आवडणारी ग्लोरिया नावाची अमेरिकन महिला आहे. तिच्याशी याबाबत झालेल्या चर्चेत मी तिला म्हटले - 'एखादा बुडत असेल तर आपण त्याची भाषा ऑक्सफर्डचे इंग्लिश आहे का बीबीसीचे इंग्लिश आहे यावर त्याला वाचवणे ठरवत नाही. (एखाद्याचा उच्चार खानदेशी आहे का वऱ्हाडी आहे का सदाशिवपेठी आहे.) यावरून त्याची वेदना कमी करायची का नाही हे जर आपण ठरवणार असू तर कलावंत सोडाच आपण माणूस म्हणवण्याच्या लायकीचेही नाही.' कलेत सौंदर्याचा भाग त्या उच्चारफरकाइतका मामुली आहे. आजमितीच्या माझ्या चित्रातील ६०-७० टक्के चित्रे सरळ सरळ सामाजिक/राजकीय आशयांवर आहेत. संवादाच्या दृष्टीने त्यांचा आढावा घेता या बहुतेक चित्रांच्या माध्यमातून मी पाहणाऱ्यांपर्यंत माझे म्हणणे पोचवले आहे. अगदी भिन्न संस्कृतीच्या, भिन्न ठिकाणच्या प्रेक्षकांना कॉम्प्युटरवर दिसणाऱ्या छोट्या प्रतिमेने प्रतिक्रिया लिहायला भाग पाडले आहे आणि या प्रतिक्रिया मला संवादाचे समाधान देतात.

त्यापुढे जाता, काही चित्रांबाबत संवादाची कसोटीच संशयास्पद असावी असे मला वाटू लागले आहे. उदाहरणार्थ, डोस्टोयवस्कीच्या 'द इडिअट' या कादंबरीतील तीन व्यक्तिरेखांचे चित्रण मी केले. हा त्या-त्या व्यक्तिरेखेचा माझा अन्वयार्थ. आता पाहणाऱ्याने जरी 'इडियट' वाचली असली तरी त्याची त्या व्यक्तिरेखेची समज निराळीच राहणार.

पण किमान दारिद्र्य, हिंसाचार, शोषण या मानवी समाजाला भेडसावणाऱ्या मानवनिर्मित परिस्थितीवरची चित्रे कॉम्प्युटर परवडू शकणाऱ्या समाजाला अस्वस्थ करू शकतात इतका विश्वास या सहा वर्षांच्या वाटचालीत मला आला आहे.

ऊर्ध्वबाहु: विरोम्येष न च कश्चित् श्रुणोति माम्। (हात वर

करून मी आक्रंदतो आहे पण माझे कोणीच ऐकत नाही) असे महर्षी व्यास महाभारत लिहून झाल्यावर म्हणाल्याचे सांगितले जाते. (त्यावरही मी एक चित्र काढले होते!) दोन-तीन वर्षांपूर्वीच्या या अवस्थेतून मी थोडाफार पुढे सरकलो आहे.

***चन्द्रशेखर पुरन्दरे***

***२१ टोर बुडली, पर्थ*** *PH 11 SY* ***स्कॉटलंड,*** *(U.K.)*

*Email - artnondeco@yahoo.co.uk*

*Website - www.art-non-deco.com*